मुलांसाठी बाइबल
प्रस्तुत

यिर्मया, रडका मनुष्य

लेखक: Edward Hughes
रेखाचित्रकार: Jonathan Hay
अनुवादक: Rev. Shilas Gavit
रूपान्तरकार: Mary-Anne S.

60 गोष्टींतील 28 (पहिली)

www.M1914.org

Bible for Children, *PO Box 3, Winnipeg, MB R3C 2G1 Canada*

परवाना (लाइसेंस): तुम्ही जोपर्यंत ही गोष्टविकत नाहीत, तोपर्यंत तुम्ही ती कॉपी किंवा मुद्रित करू शकता.

यिर्मया, यहुदा राज्यातील एका धार्मिक कुटुंबात जन्मास आला होता. त्याचे वडील हिल्कीया हे एक याजक होते. हे कुटुंब यरुशलेमेपासून जवळच असलेल्या अनाथोथ नावाच्या गावात राहात होते. यिर्मया देखिल याजक बनेल असे यिर्मयाच्या आईवडीलांना कदाचित वाटले असेल. परंतू त्याच्यासाठी देवाकडे वेगळी योजना होती.





यिर्मयाच्या जन्माच्या वेळी, देवाचे लोक, देवाच्या वचनाप्रमाणे जिवन जगत नव्हते. जवळपास प्रत्येक जण; राजा पासून तर रंका पर्यंत सर्वच मुर्ति व खोट्या देवांच्या भजनी लागले होते – ऐवढेच नव्हे तर देवाच्या मंदिरात देखिल अन्य देवाची ते भक्ति करित होते !

यिर्मया जेंव्हा तरुण
मुलगा होता तेंव्हा परमेश्वर
त्याच्याशी बोलला, "तुझा जन्म होण्याच्या आधिच तू मला ठाऊक
होतास, आणि तूं माझ्यासाठी बोलशील याची मी योजना केली."

3

परमेश्वराचे असे बोलणे यिर्मयाला घाबरविणारे असे होते. तेंव्हा तो म्हणाला, "अहो, प्रभू परमेश्वर, पाहा, मला बोलावयाचे ठाऊक नाही; मी केवळ बाळ आहे." तो विस वर्षाचा होता – तो बाळक राहिलेला नव्हता. परंतू त्याच्या आजूबाजूला असलेल्या दुष्ट लोकांबरोबर तो देवाच्या वतीने बोलू शकेले असे यिर्मयाला वाटत नव्हते.



4



"घाबरु नको" असे म्हणत
परमेश्वराने यिर्मयाला
धिर दिला.

"ज्या कोणाकडे
मी तुला पाठविन
त्याजकडेतूं जा व तुला
आज्ञापीन ते बोल.

5



तुझा बचाव करण्यास
मी तुझ्याबरोबर
आहे.

मग देवाने
काहीतरी विशेष
केले. देवाने यिर्मयाच्या
मुखाला स्पर्श केला.

6

देवाने यिर्मयाला धैर्य, शक्ति आणि शहाणपण दिले. त्याने मोठ्याने ओरडून संदेश दिला, देव लोकांवर प्रीति करतो आणि तो त्यांना मदत करु इच्छितो याची त्याने त्यांना आठवण करुन दिली. परंतू कोणीही त्याचे ऐकले नाही. राजाने देखिल त्याचे ऐकले नाही.

7

ऐवढेच नव्हे तर याजकांना देखिल त्याचा राग आला आणि त्यांनी त्याला देवाविषयी न बोलण्याचे सांगितले. यिर्मया सत्य सांगत नाही असे सांगून त्याच्यावर खोटे आरोप करणारे तेथे काही खोटे संदेष्टे देखिल होते.



8

जवळपास शंभर वर्षे आधि उत्तरे कडिल इस्त्राएल राज्याने परमेश्वराला सोडून दिले होते, याची यिर्मयाने लोकांना आठवण करुन दिली. अश्शुर, या त्यांच्या शत्रूंनी, त्यांचा पाडाव केला आणि सर्व इस्त्राएल लोकांना त्यांच्या मायभूमिपासून दुर देशी नेले.

9



10



11

लोकांनी त्यांच्या मुर्तिवर भरोसा केला. मुर्ति त्यांना त्यांच्या शत्रूंच्या हातून सोडविल काय? नाही ! केवळ परमेश्वरच त्यांना सोडवू शकतो. लोकांना यिर्मयाचा फार राग आला, त्यांनी त्याला जिवे मारण्याची योजना आखली. परंतू देवाने त्याच्या सेवकाचे संरक्षण केले.



12

अखेरिस परमेश्वराने असे काही तरी सांगितले त्याच्यामुळे यिर्मयाला धक्काच बसला. परमेश्वराने त्याला म्हटले, "या लोकांसाठी तूं प्रार्थना करु नकोस. जेंव्हा ते मदतीसाठी माझा धावा करतील तेंव्हा मी त्यांचे ऐकावयाचे नाही."



13

बाबेलच्या सैन्यासंगती होणाऱ्या युध्द्यात तूं हारणार आहे अशी यिर्मयाने यहुदाच्या राजाला चेतावणी दिली. राजाला त्याचा फार राग आला आणि त्याने यिर्मयाला तुरुंगात टाकले. तुरुंगात असतांना देखिल यिर्मया संदेश देत परमेश्वरावर भरोसा करित राहिला.

14



यिर्मया, रडका मनुष्य

परमेश्वराची वाणी - बाइबल मधून गोष्ट

घेण्यात आली आहे

यिर्मया

"तुझ्या वचनांच्या उलगड्याने प्रकाश प्राप्त होतो."
स्तोत्रसंहिता ११९:१३०

ईश्वराला माहित आहे की आम्ही वाईट गोष्टी केल्या आहेत, ज्याला तो पाप म्हणतो. पापाची शिक्षा मृत्यू आहे.

ईश्वर आमच्यावर इतके प्रेम करतो की क्रॉसवर मरण्यासाठी आणि आमची शिक्षा भोगण्यासाठी त्याने आपल्या पुत्राला येशूला पाठविले. येशू पुन्हा जिवंत झाला आणि स्वर्गात परत गेला! आता ईश्वर आमच्या पापांसाठी क्षमा करू शकतो.

जर तुम्ही तुमच्या पापांपासून मुक्ती मिळवू इच्छिता, तर ईश्वराला हे सांगा: प्रिय ईश्वरा, येशू माझ्यासाठी मेला आणि आता पुन्हा जगतो आहे यावर माझा विश्वास आहे. कृपा करून माझ्या जीवनात ये आणि माझ्या पापांसाठी मला क्षमा कर, जेणेकरून आता मला नवीन जीवन प्राप्त होईल आणि नंतर मी कायम तुझ्याबरोबर राहीन. तुझे मूल होऊन तुझ्यासाठी जगण्यास मला मदत कर. आमेन. जॉन 3:16

बाइबल वाचा आणि ईश्वराशी रोज बोला!